**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- २३५८/२०२४**

**अपिलार्थी, श्री.जगदंबा प्रसाद पांडेय,**
खोजा तबेला मनोरपाडा, आग्रा रोड,
ब्रहमाळा तलाव जवळ, ठाणे (प) ४०० ६०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्र.अधीक्षक,
शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
शिवाजी विद्यालय, (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं. २,
सुभाष नगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४००६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.०८.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.१०.२०२३ | -- | ०६.०३.२०२४ | १६.०४.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि. ०४.०७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये *"आवश्यक ती माहिती न देता चुकीचे उत्तर देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी ॲड.विमल प्रकाश यादव उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.विजय रंगनाथ साळवे, प्र.अधीक्षक, शिक्षण विभाग, ठाणे महानगपालिका, ठाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" संदर्भ, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई रिट पिटीशन नं. ८८०८/२०२३ (सुनिता रा. यादव, एज्युकेशन सोसायटी व इतर), संदर्भित पिटीशन मध्ये मा. शिक्षण विभाग, ठा.म.पा. ठाणे यांना रिस्पाउंट नं. ३ करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील रिस्पांड नं. २ मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय ठाणे यांनी आपणाकडे रिट पिटीशन सुनिता राजबली यादव (शि.से./स.शि) हिचे प्रमाणपत्र करीता सादर केले आहे.परंतु हेतपुरस्पर न्यायालयाकडून तरी कृपया वरील नमूद प्रस्तावाची प्रमाणित नक्कल न्यायालयीन कामाकरीता त्वरीत मिळणेस विनंती."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. त्याविरुध्द केलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन,असे आदेश पारित केले आहेत की, *"जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, पोखरण रोड नं.२, ठाणे प. ४०० ६०१ यांनी कार्यालयीन दप्तरी उपलब्ध असलेली माहिती पा.क्र.१ अर्जदारास यापूर्वीच दिलेली असून माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही असे कळविले आहे.*

*तसेच अर्जदार यांचे प्रतिनिधी यांनी सादर केलेल्या युक्तीवाद रिट पिटीशन क्र.६९६१/२०१२ दि.२७.०२.२०१५ चे आदेशानुसार फौजदारी कायदा चालू ठेवण्याचे निर्देश आहेत. परंतु सामान्य प्रशासन विभाग, सांकेतांक क्र.२०२२०८२५१७०७०८४८०७ दि.२५.०८.२०२२ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत आदेशित केलेले आहे. तरी सदर प्रकरणी विधी विभाग यांचे निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी सदर प्रकरण विधी विभागाकडून प्राप्त होताच आपणांस कळविण्यता येईल."*

तथापि अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, ठाणे यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या

प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, ठाणे यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०१.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०१.१०.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४००६०१.

-**यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
शिवाजी विद्यालय, (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं. २,
सुभाष नगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४००६०१. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक ०१.१०.२०२५ ( In Continuation of order dt. १८.०८.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०१.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.परेश दिक्षित उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.सत्यनारायण यादव, मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, ठाणे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. आयोगाचे दिनांक १८.०८.२०२५ रोजीच्या आदेशानुसार माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले होते.

यासंदर्भात खुलासा करताना विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सत्यनारायण यादव, मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी असे निवेदन केले की, सदरची माहिती त्यांना त्यांचेपूर्व कार्यरत असलेल्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत.

आयोगाने दि.१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांचा लेखी खुलासा मागविला होता. तथापि सदर आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाली किंवा कसे? हे स्पष्ट होत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर हे मान्य केले की, सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोस्टाद्वारे तसेच व्हॉटस् ॲप द्वारे पाठवतील. विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती ज्य कोण्या व्यक्तीकडे/संस्थेकडे उपलब्ध असेल, त्यांचेकडून प्राप्त करुन उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी

श्री.रामजी डी. यादव, मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या दि.१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे त्यांचा लेखी खुलासा सादर करणे योग्य होईल.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी याप्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालून ही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध होईल अशी व्यवस्था करुन, तसा अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ज्या व्यक्तीकडे/संस्थेकडे उपलब्ध असेल, त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रामजी डी.यादव (सेवानिवृत्त), मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांनी आयोगाच्या दि.१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबतचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी याप्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालून ही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१७.११.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२५ .

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रामजी डी.यादव (सेवानिवृत्त), मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४००६०१.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
शिवाजी विद्यालय, (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं. २,
सुभाष नगर, ठाणे (प.), ता.जि.ठाणे ४००६०१. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

## सुनावणी दिनांक १७.११.२०२५ ( In Continuation of order dt. ०१.१०.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.१७.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी याप्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालून ही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १७.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.सत्यनारायण यादव, मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले की, त्यांना कार्यभार स्विकारतेवेळी पुरेसे कागदपत्रे प्राप्त झालेले नव्हते. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रामजी डी.यादव (सेवानिवृत्त), मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय (हिंदी प्राथमिक), पोखरण रोड नं.२, सुभाषनगर, ठाणे (प.) यांना आयोगाने दि.१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशानुसार लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. ते आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे.

त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की,सदर शाळेत कार्यरत तत्कालीन मुख्याध्यापक श्री.आर.पी.सिंह सेवेच्या वयोमानानुसार दिनांक ३१.१२.२०१४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने आपल्याला १ जानेवारी २०१५ पासून मुख्याध्यापक पदावर नियुक्त करण्यात आले. परंतु ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाकडून मुख्याध्यापक पदाची मान्यता न देता सन २०१८ पर्यंत आपल्याला मुख्याध्यापक पदाच्या स्वाक्षरी अधिकार ३-३ महिन्यासाठी दिले जात होते. मी या अन्याया विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४३९४/२०१७ दाखल केली होती. सदर याचिकेचा दि.२२.०२.२०१८ रोजी आदेश देण्यात आले. त्यानुसार शिक्षणाधिकारी यांनी दि.२६.०२.२०१८ रोजी मुख्याध्यापक पदाची मान्यता प्रदान केलेली होती. महोदय, तत्कालीन मुख्याध्यापक श्री.आर.पी.सिंह यांनी आपणास शाळेचे कोणतेही अभिलेखांचे चार्ज दिले नाही. त्यासाठी आपण संस्थेचे सचिव श्री.बलराज मलैया अवधुता यांच्याशी लेखी व तोंडी मागणी करुन सुध्दा अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले नाही. आपण शिक्षणाधिकारी, पोलीस निरीक्षक, संस्थेची अन्य पदाधिकारी यांना कुलूप लावले कपाट उघडून पंचनामा करुन अभिलेख मुख्याध्यापक यांच्या ताब्यात मिळण्यासाठी निवेदन सादर केले. त्या अनुषंगाने दिनांक १५.०८.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता पंचांच्या समक्ष कुलूप तोडून पंचनामा करुन कपाटात असलेल्या अभिलेखांचे पंचनामा होऊन आपणास अभिलेख प्राप्त झाले. सदर अभिलेखांची यादीमध्ये शाळा समितीचा एजेंडा आणि मिनिट्स मिळाले नाही. पंचनामा यादी सध्याचे मुख्याध्यापक यांचेकडे उपलब्ध असेलच पाहिजे. त्यांनी त्याची प्रत आपणास द्यावी आणि अभिलेखांच्या संदर्भात सचिव श्री.बाळाराज मलैय्या अवधूता यांच्याशी केलेल्या पत्र व्यवहारांची ही प्रत आयोगास द्यावी.

श्री.रामजी यादव यांनी आपल्या खुलाश्यामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, यापूर्वी ते मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी असताना त्यांचेकडे ही अपिलकर्ता यांनी सतत यासंदर्भात माहितीची मागणी केली होती व त्यावेळी उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, सचिव श्री.बाळराज मलैय्या अवधूता हे अपिलकर्ता श्री.शिवशंकर यांच्याच खोलीत राहत असल्याने, असे अनेक महत्वपूर्ण शाळेच्या अभिलेख आपल्या अभिरक्षेत ठेवला होता. या सर्व अभिलेखांची जाण अपिलकर्ता यांना आहे. याची माहिती आपण आयोगास दिली असून, आयोगाने याबाबत निर्णय दिले आहेत. त्याचीही प्रत मुख्याध्यापक यांनी आयोगाच्या निदर्शनास आणावे. महोदय दि.१५.०८.२०१८ पासून नियमानुसार शाळा समितीचा गठन होऊन पुढील मिनिट्स झालेले आहे. त्याची प्रत मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळू शकेल. परंतु सन २०१८ पूर्वीचा शाळा समितीचा गठन आणि मिनिट्स उपलब्ध नसल्याने अपिलकर्ता यांना देता येणार नाही. या परिस्थितीत आपले विरुध्द शास्ती आकारण्यात येऊ नये, अशी विनंती अपिलार्थी यांचे तर्फे करण्यात आली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा खुलासा बघता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना कार्यभार स्विकारतानाच प्राप्त झालेली नाही. ही बाब विद्यमान मुख्याध्यापकांनी मान्य केली आहे. म्हणजेच अत्यंत महत्वाचा असा अभिलेख शाळेच्या कार्यालयातून गहाळ झालेला आहे अथवा चोरीला गेला आहे असे असताना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. महत्वाचा अभिलेख उपलब्ध नसल्याने मुख्याध्यापक यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या तरतूदीनुसार संबंधितांविरुध्द कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि अशा प्रकारीच कार्यवाही त्यांनी का केली नाही. हे लक्षात येत नाही.

आयोगाने दि.०१.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये असेही आदेशित केले होते की, प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी याप्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालून ही माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. तथापि शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी असा कोणताही अहवाल सादर केलेला नाही. तसेच ते आजच्या सुनावणीसही उपस्थित राहिले नाहीत.

या महत्वाच्या प्रकरणामध्ये आयोगाने शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपिलका यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले असताना देखील त्यांनी अनास्था दाखविलेली आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेही आयोगाच्या दि.०१.१०.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीसह स्वतः उपस्थित राहणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगाच्या दि.०१.१०.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल घेऊन स्वतः उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०८.१२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग,
चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ